निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
मंगळवार
२० जानेवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३२६ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

# छत्रपती शिवाजी महाराजांचा स्वधर्म, स्वदेश, स्वभाषेचा वसा घेऊन भारताच्या विकासात योगदान देऊया : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**- महाराष्ट्र राज्यगीताच्या प्रेरणादायी सुरांनी दुमदुमली झ्युरिक भूमी**
**- बृहन महाराष्ट्र मंडळाकडून मुख्यमंत्र्यांचे भव्य-दिव्य, हृदयस्पर्शी स्वागत**

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/** 'छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेला स्वधर्म, स्वदेश आणि स्वभाषा वसा घेऊन, भारताला विकासाच्या उत्तुंग वाटेवर घेऊन जाऊया, असे आवाहन करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज स्वित्झर्लंड झ्युरीक येथील बृहन महाराष्ट्र मंडळाच्या स्वागताचा स्वीकार केला. येत्या काळात महाराष्ट्र भारतातील ट्रिलीयन डॉलर्स ईकॉनॉमीचे राज्य म्हणून उदयास येईल. त्यामुळे विदेशात राहणाऱ्या मराठी माणसाचा महाराष्ट्राचा अभिमान आणखी वृद्धिंगतच होईल, असा विश्वास व्यक्त करत, मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी या मराठी बांधवांचा विदेशातील महाराष्ट्राचे राजदूत असा गौरवाने उल्लेख केला.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांचे वर्ल्ड इकोनॉमिक फोरमसाठी आज झ्युरिक येथे आगमन झाले. पाच दिवसांच्या दौऱ्यासाठी येताच त्यांचे मराठमोळ्या पद्धतीने स्वागत करण्यात आले. पारंपरिक वेश, पारंपरिक पद्धती आणि पारंपारिक उत्साहात मराठीजनांनी केलेल्या स्वागताबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे आभार मानले. महाराष्ट्राच्या राज्यगीताने झ्युरीकचे सभागृह दुमदूमून गेले.

मराठी बांधवांचे कार्य महाराष्ट्राचा पासपोर्ट!

ते म्हणाले की, पारंपरिक वेश, पारंपरिक पद्धती आणि पारंपरिक उत्साह या तीनही गोष्टी बघायला मिळाल्याने. एक प्रकारे आपण परदेशात राहणारी मंडळी, महाराष्ट्राचे आणि मराठीचे राजदूत आहात. महाराष्ट्राची संस्कृती, आपली भाषा याचा परिणाम आणि प्रभाव तयार करता. मराठी बांधवांनी जगभरात नाव कमावले आहे. आपल्याकडे पाहून, अनेक देशात मराठी माणसाला सन्मान मिळतो. कारण आपल्या देशातील मराठी लोकांनी चांगलं काम केले आहे. त्या-त्या देशाच्या संस्कृतीमध्ये, व्यवसाय, उद्योग-व्यवसायामध्ये जे-जे योगदान दिले आहे, त्यामुळे आम्हालाही सन्मान मिळतो. या देशातील उद्योगांनाही आपल्याला भारतात कुठे जायचे आहे, तर भारतात जायचे असे वाटते. कारण मराठी माणूस अतिथ्यशील, स्वागतशील आणि उद्यमशील आहे. मराठी माणूस मेहनती आहे. अशा पद्धतीने मराठी माणसाची प्रतिमा आपण निर्माण केली आहे. याच जोरावर यंदाही महाराष्ट्र दावोस मधील गुंतवणूक परिषदेत महाराष्ट्राचा बोलबोला राहील!

महाएनआरआय कनेक्ट..!

जगभरातील मराठी-भारतीय मंडळी इतक्या वेगवेगळ्या गोष्टी करत आहेत. त्यातील अनेक गोष्टी या अतिशय अर्थपूर्ण आणि अभिनव, परिवर्तनशील अशा आहेत. या सगळ्या गोष्टींचे अदान-प्रदान झाले पाहिजे. यासाठी बृहन्महाराष्ट्राशी म्हणजेच बृहद महाराष्ट्राशी संबंधित मराठी जन आहेत, त्यांचा कनेट जगातील अन्य मराठी बांधवाशी असला पाहिजे. त्यासाठी हे व्यासपीठ-प्लॅटफॉर्म महत्वपूर्ण ठरेल. कारण छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपल्याला स्वदेश, स्वधर्म आणि स्वभाषा यांचा वसा-वारसा दिला आहे. या तीनही गोष्टींसाठी हा प्लॅटफॉर्म आपल्याला एकमेकांशी जोडेल. तो परस्परांतील संपर्क- समन्वय वाढविण्यासाठी सहाय्यभूत ठरेल. यातून आपल्या सर्वांसाठी समृध्दीचा नवीन मार्ग खुला होईल.

सांस्कृतिक समृद्धी म्हणूनच महाराष्ट्र समृद्ध!

मराठी भाषा अभिजात होती. पण तिला राज्यमान्यता मिळणे आवश्यक होते. ही राज्यमान्यता मिळवून देण्यासाठी आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विशेष पुढाकार घेतल्याचे उल्लेख करून, मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, आपण विदेशातील मराठी बांधव मराठी भाषेच्या संवर्धनाकरिता, मराठी भाषेच्या संपन्न-समृद्धीकरिता प्रय़त्न करत आहात, हे कौतुकास्पद आहे. भारताबाहेर आपण युरोपमध्ये मराठी शाळा चालवता. मुलांना मराठी भाषा शिकवता. भाषा या माध्यमामुळे आपण आपली संस्कृती, संस्कार, उत्सव, आपले साहित्य, कला यांच्याशी जोडलो जातो. भारतात महाराष्ट्र भौतिकदृष्ट्या समृद्ध, संपन्न तसेच सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध समजले जाते. महाराष्ट्राने केवळ भौतिक समृद्धी मिळविलेली नाही, तर तर सांस्कृतिक समृद्धी देखील मिळवलेली आहे. आपण सांस्कृतिक समृद्धी टिकवली म्हणूनच भौतिक दृष्ट्या समृद्ध ठरलो आहोत. यातूनच महाराष्ट्र हे येत्या तीन वर्षात भारतातील ट्रिलीयन डॉलर्सची अर्थव्यवस्था असणारे पहिले राज्य ठरेल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. यावेळी त्यांनी महाराष्ट्र विदेशी थेट गुंतवणूक, स्टार्ट अपमध्ये, निर्यात, मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रात प्रथम क्रमांकांचे राज्य आहे. देशातील साठ टक्के डाटा सेंटर्स महाराष्ट्रात आहेत. एआय आणि संरक्षण क्षेत्रातील उत्पादनांतही महाराष्ट्र सर्वात पुढे असल्याचा उल्लेख केला.

स्वित्झर्लंडमधील भारताचे राजदूत मृदुलकुमार यांनी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांचे स्वागत केले. केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी आणि किंजारापू राम मोहन नायडू यांनीही भेट घेत मुख्यमंत्र्यांचे महाराष्ट्रातील महापालिका निवडणुकीत मिळालेल्या प्रचंड यशाबद्दल त्यांचे अभिनंदन केले. बृहन्महाराष्ट्र मंडळाकडून झालेल्या कार्यक्रमात 'स्वागत देवाभाऊ' असे फलक झळकले. आंतरराष्ट्रीय मराठी मंचाचे समन्वयक अमोल सावरकर यांनी आज झ्युरिक येथे मराठी मंचाने स्वित्झर्लंडमधील विविध शाळांमध्ये मराठी भाषेचा वर्ग सुरू करण्याचा उपक्रम हाती घेतल्याचे सांगितले.

### दरवर्षी बदललेली मुंबईप्रत्येक शहरात विकास!

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशात पायाभूत सुविधांची निर्मिती झाली, त्यामध्ये सर्वाधिक आयकॉनिक इन्फ्रास्ट्रक्चर निर्मितीत महाराष्ट्र पुढे आहे असा उल्लेख करून ते म्हणाले, मुंबईचा कायापालट करतो आहोत. पुढच्या काळात अजून काही महत्वाकांक्षी बदल होणार आहेत. दरवर्षी आपण मराठी मुंबईत परत याल, त्या प्रत्येक वर्षी मुंबई बदलेली दिसेल. २०३० मध्ये जगातल्या विकसित राष्ट्राच्या राजधानीच्या शहराहून उत्तम मुंबई पुढच्या पाच वर्षात तयार झालेली दिसेल. मुंबईच नव्हे, तर हे परिवर्तन पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, नाशिक आणि कोल्हापूरातही दिसेल. अतिशय चांगल्या पद्धतीने आपण विकासाचा वेग पकडला आहे. आता महाराष्ट्र थांबणार नाही, या ध्येयवाक्य प्रमाणेच महाराष्ट्र अतिशय वेगाने पुढे जाणार आहे. यात विदेशात राहणाऱ्या मराठी बांधवांचेही महत्वाचे योगदान राहणार आहे.

---

## संक्षिप्त

### वार्षिक नि:शस्त्रीकरण आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षा व्यवहार फेलोंना सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी



**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/** सहाव्या वार्षिक नि:शस्त्रीकरण आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षा व्यवहार फेलोशिप कार्यक्रम अंतर्गत मुंबई येथे आलेल्या विविध ४० देशातील प्रतिनीधींना सह्याद्री अतिथीगृह येथे महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडविण्यात आले. राज्याच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्यावतीने आयोजित कार्यक्रमात या प्रतिनीधींना सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी मिळाली. यावेळी मुख्य राजशिष्टाचार अधिकारी राजेश गवांदे उपस्थित होते.

विविध ४० देशांतून आलेल्या फेलोंचे मुख्य राजशिष्टाचार अधिकारी श्री. गवांदे यांनी स्वागत करीत भारताच्या विविधांगी संस्कृतीचे महत्व विषद केले. त्यांनी मुंबईचे जागतिक आणि भारतातील महत्व अधोरेखित करीत महाराष्ट्राच्या संस्कृतीविषयी माहिती दिली. यावेळी लावणी, पंढरपूर वारी, सांस्कृतिक कार्यक्रम आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावरील गीतनाट्य सादर करण्यात आले.

### सांस्कृतिक कार्य विभागामार्फत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी मराठी एकांकिका स्पर्धेचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/** राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत आयोजित 'महाराष्ट्र राज्य मराठी एकांकिका स्पर्धा' यावर्षी चार विभागांतून साकार होत आहे. या स्पर्धेतून मराठी एकांकिका चळवळीत नवा इतिहास घडणार असल्याचा विश्वास सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार यांनी व्यक्त केला आहे.

ही एकांकिका स्पर्धा यावर्षीपासून फक्त महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेली आहे. कोकण विभागातील स्पर्धेचे १९ ते २३ जानेवारी, २०२६ या कालावधीत यशवंत नाट्य मंदिर, माटुंगा येथे आयोजन करण्यात येत आहे. याचबरोबर ही स्पर्धा पुणे, अमरावती आणि छत्रपती संभाजीनगर या चार प्रमुख विभागांत प्राथमिक फेरीच्या स्वरुपात घेण्यात येणार आहे. राज्यभरातून सहभागी होणाऱ्या नाट्यसंघांसाठी ही एक सुवर्णसंधी ठरणार आहे. प्राथमिक फेरीत सादरीकरण करणाऱ्या संघांमधून प्रत्येक विभागातून ५ उत्कृष्ट संघांची महाअंतिम फेरीसाठी निवड करण्यात येणार असून, अशा प्रकारे एकूण २० संघ अंतिम टप्प्यात पोहोचणार आहेत. विशेष बाब म्हणजे ही संपूर्ण प्राथमिक फेरी निशुल्क ठेवण्यात आली आहे. जास्तीत जास्त नाट्यसंघांनी व रसिक प्रेक्षकांनी या एकांकिका स्पर्धेतील नाटकांचा लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे यांनी केले आहे. मराठी रंगभूमीतील नवोदित कलाकारांना व्यासपीठ देणे, एकांकिका चळवळीला नवसंजीवनी देणे आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा वारसा अधिक समृद्ध करणे, हाच या भव्य स्पर्धेचा मुख्य उद्देश असल्याचेही यावेळी मंत्री ड. शेलार यांनी सांगितले.

---

# चांदीने ओलांडला ३ लाखांचा टप्पा; सोन्याच्या दरातही मोठी दरवाढ

**आत्ताच एक्सप्रेस**

**खामगाव/जळगाव/प्रतिनिधी/** देशातील सोन्या-चांदीच्या बाजारपेठेत आज एक ऐतिहासिक दिवस ठरला आहे. प्रसिद्ध अशा खामगाव आणि जळगावच्या बाजारपेठेत चांदीच्या दराने आजवरचे सर्व विक्रम मोडीत काढत ३ लाख रुपयांचा टप्पा ओलांडला आहे. जागतिक बाजारपेठेतील घडामोडींमुळे सोनेही आता दीड लाखाच्या उंबरठ्यावर पोहोचले आहे.

खामगाव येथे चांदीचे भाव ३ लाख ४ हजार रुपये प्रति किलो वर पोहोचले असून, जळगावमध्ये सोन्याचे दर जीएसटीसह १ लाख ४८ हजार रुपये झाले आहेत. या प्रचंड दरवाढीमुळे सर्वसामान्यांच्या खरेदीवर मोठा परिणाम झाला असून बाजारपेठेत ७० टक्के ग्राहक कमी झाल्याचे चित्र आहे.

### दरवाढीचे 'टॉप ५' धमाके


- विक्रमी चांदी: एकाच दिवसात १० हजार रुपयांची वाढ होऊन दर ३,०३,८५० रुपयांच्या पुढे.
- चकाकणारे सोने: २ हजार रुपयांच्या वाढीसह सोने आता १.४८ लाखांवर.
- आंतरराष्ट्रीय कारणे: अमेरिका-इराण तणाव आणि व्हेनेझुएलातील अस्थिरतेचा फटका.
- व्यापाऱ्यांचा अंदाज: आगामी काळात दरवाढीचा हा सिलसिला असाच सुरू राहण्याची शक्यता.
- मंदीचे सावट: वाढत्या दरामुळे बाजारपेठेतील खरेदी ७० टक्क्यांनी घटली.

### दरवाढ का झाली? (प्रमुख कारणे)

- जागतिक तणाव: इराण आणि व्हेनेझुएला मधील राजकीय अस्थिरतेमुळे सोन्या-चांदीत गुंतवणूक वाढली.
- डॉलरची मजबूती: डॉलरच्या तुलनेत रुपया कमकुवत झाल्याने आयात महागली आहे.
- व्याजदर कपात: आंतरराष्ट्रीय बँकांनी व्याजदरात केलेली कपात धातूंच्या दरवाढीला कारणीभूत ठरली.
- सुरक्षित गुंतवणूक: युद्धाची भीती आणि आर्थिक अनिश्चिततेमुळे लोक शेअर बाजाराऐवजी सोन्याला पसंती देत आहेत.

---

# भीषण अपघात, चार जणांचा जागीच मृत्यू, २० जखमी



**आत्ताच एक्सप्रेस**

**नाशिक/प्रतिनिधी/** मालेगाव-मनमाड महामार्गावर आज पहाटे भीषण अपघात घडला असून, या दुर्घटनेत चार जणांचा जागीच मृत्यू झाला आहे, तर दोघे जण गंभीर जखमी असून २० पेक्षा अधिक प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. ही दुर्घटना मालेगाव तालुक्यातील वऱ्हाणे गावाजवळ पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास घडली.

पुण्याकडून मालेगावच्या दिशेने येणारी एक खासगी ट्रॅव्हल्स आणि समोरून येणाऱ्या पिकअप वाहनाची समोरासमोर जोरदार धडक झाली. धडकेची तीव्रता इतकी मोठी होती की, पिकअप वाहन थेट ट्रॅव्हल्समध्ये घुसले आणि बसच्या पुढील भागाचे मोठे नुकसान झाले. अपघातानंतर घटनास्थळी एकच गोंधळ उडाला.

**चार प्रवाशांचा जागीच मृत्यू :** या अपघातात चार प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला, तर दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. याशिवाय ट्रॅव्हल्समधील २० हून अधिक प्रवासी किरकोळ जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच पोलिस व स्थानिक नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. अपघातातील प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी मदतकार्य राबवण्यात आले.

**जखमींवर उपचार सुरु :** जखमींना मालेगाव सामान्य रुग्णालयात हलवण्यात आले असून, काहींची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला असून, अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी पुढील तपास सुरू आहे. या भीषण अपघातामुळे मालेगाव-मनमाड मार्गावर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती.

---

# ७.६५ रुपयांच्या चोरीचा खटला, तबबल ५० वर्षांनी निकाली

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/** अवघ्या ७.६५ रुपयांच्या चोरीप्रकरणी दाखल झालेला खटला तब्बल जवळपास पाच दशकांनंतर अखेर न्यायालयीन प्रक्रियेचा शेवट गाठत आहे. १९७७ साली नोंदवण्यात आलेल्या या प्रकरणावर माझगाव येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने अखेर पडदा टाकला असून, दशकानुदशके प्रलंबित राहणाऱ्या खटल्यांच्या ओझ्यावर न्यायव्यवस्थेचा भार किती वाढला आहे, याचे हे ठळक उदाहरण ठरत आहे.

या प्रकरणात दोन अज्ञात व्यक्तींवर ७.६५ रुपयांची चोरी केल्याचा आरोप ठेवण्यात आला होता. त्या काळात ही रक्कम तुलनेने मोठी मानली जात होती. पोलिसांनी जामीनपात्र नसलेले अटक वॉरंट जारी केले होते, मात्र अनेक वर्षांच्या शोधानंतरही दोन्ही आरोपींचा काहीही ठावठिकाणा लागला नाही. परिणामी हा खटला वर्षानुवर्षे केवळ नोंदीपुरताच प्रलंबित राहिला.

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी आरती कुलकर्णी यांनी १४ जानेवारी रोजी दिलेल्या आदेशात स्पष्ट केले की, जवळपास ५० वर्षे उलटूनही या प्रकरणात कोणतीही ठोस प्रगती झालेली नाही. अशा स्वरूपाचे प्रकरण अनावश्यकपणे प्रलंबित ठेवण्यात कोणताही अर्थ नाही, असे नमूद करत न्यायालयाने भारतीय दंड संहितेच्या कलम ३७९ (चोरी) अंतर्गत दाखल असलेला गुन्हा बंद करण्याचा निर्णय घेतला. न्यायालयाने दोन्ही आरोपींना दोषमुक्त करत, जप्त करण्यात आलेली ७.६५ रुपयांची रक्कम तक्रारदाराला परत देण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, जर तक्रारदार उपलब्ध झाला नाही, तर अपीलची मुदत संपल्यानंतर ती रक्कम सरकारी खात्यात जमा करण्यात येणार आहे. यावेळी न्यायालयाने हेही अधोरेखित केले की, चोरीची रक्कम २ हजार रुपयांपेक्षा कमी असल्याने हा खटला फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २६० अंतर्गत 'संक्षिप्त सुनावणी'स पात्र ठरतो.

---

# मुंबईत बिहार सरकारची एन्ट्री! 'बिहार भवन' साकारणार; नितीश सरकारचा मोठा मास्टरप्लॅन

**आत्ताच एक्सप्रेस**


**मुंबई/प्रतिनिधी/** देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत आता बिहारची स्वतंत्र ओळख निर्माण होणार आहे. मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखालील बिहार सरकारने मुंबईत एक भव्य आणि अत्याधुनिक 'बिहार भवन' उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. ३० मजल्यांची ही टोलेजंग इमारत केवळ प्रशासकीय केंद्र नसून मुंबईतील बिहारवासीयांसाठी एक भक्कम आधारकेंद्र ठरणार आहे.

**प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये:** उंची आणि भव्यता: ही इमारत ३० मजली असेल, ज्याची एकूण उंची सुमारे ६९ मीटर (बेसमेंटसह) प्रस्तावित आहे.

कुठे साकारणार? मुंबई पोर्ट ट्रस्टच्या परिसरातील एलफिंस्टन एस्टेट येथे ही वास्तू उभी राहील.

क्षेत्रफळ: सुमारे ०.६८ एकर म्हणजेच २७५२.७७ चौरस मीटर जागेवर हे बांधकाम होणार आहे.

प्रचंड गुंतवणूक: या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी बिहार सरकारने ३१४.२० कोटी रुपयांच्या निधीला प्रशासकीय मंजुरी दिली आहे.




**आधुनिक सोयी-सुविधांनी सज्ज 'ग्रीन बिल्डिंग' :** दिल्लीतील बिहार भवनाच्या धर्तीवर मुंबईतील हे भवन देखील जागतिक दर्जाचे असेल. यात पर्यावरणाची विशेष काळजी घेण्यात आली आहे:

१. पर्यावरणपूरक तंत्रज्ञान: इमारतीवर सौर पॅनेल बसवले जातील.

२. पाणी व्यवस्थापन: सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी अत्याधुनिक STP प्लांट.

३. सुविधा: ७२ आसनी हायटेक सभागृह, प्रशासकीय कार्यालये आणि सुसज्ज पार्किंग व्यवस्था.

**मुंबईतील बिहारवासीयांसाठी 'वन स्टॉप सेंटर' :** रोजगार, शिक्षण आणि विशेषतः टाटा मेमोरियल हॉस्पिटल सारख्या रुग्णालयांत उपचारासाठी बिहारमधून मोठ्या प्रमाणावर लोक मुंबईत येतात. या सर्वांसाठी हे भवन अत्यंत उपयुक्त ठरेल:

विद्यार्थी आणि रुग्ण: परराज्यातून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आणि रुग्णांच्या नातेवाईकांसाठी निवासाची सोय.

शासकीय मदत: बिहार सरकारशी संबंधित कामांसाठी नागरिकांना आता थेट मुंबईतच मार्गदर्शन आणि सहकार्य मिळेल.

प्रशासकीय पकड: या प्रकल्पामुळे मुंबईतील बिहार सरकारची उपस्थिती अधिक अधिकृत आणि बळकट होणार आहे.

सद्यस्थिती: प्रकल्पाचा सविस्तर अहवाल (DPR) तयार असून जागेची सीमा भिंत बांधून पूर्ण झाली आहे. सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली असून लवकरच निविदा (Tender) प्रक्रिया पूर्ण होऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल.

# महाराणा प्रताप ना कभी हारे; ना अकबर कभी जीता!

मेवाडचे महाराणा प्रतापसिंह हे नाव जगप्रसिद्ध आहे. मेवाडच्या सिंहाने अकबरासारख्या बलाढ्य बादशहाशी,मेवाड आणि राजपुताना यांच्या स्वातंत्र्यासाठी २५ वर्षे तहान-भूक विसरून लढा दिला.मेवाडचे स्वतंत्र टिकवण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाला इतिहासात कुठेही तोड नाही.प्रतापसिंहाच्या तेजाने केवळ राजपुतानाच नव्हे तर संपूर्ण भारत प्रभावित झाला होता.त्यामुळेच प्रतापसिंहांना संपूर्ण भारतात पूज्य मानल्या जाते.भारतीय इतिहासात महाराणा प्रतापसिंह यांना आजही मोलाचे स्थान आहे.कारण महाराणा प्रताप यांच्या नावानेच त्याकाळी मुगल घाबरत असे.त्यामुळेच भारत भुमिला महाराणा प्रतापसिंहांचा मोठा अभिमान आहे.महाराणा प्रताप यांचा जन्म ९ मे १५४० साली उत्तर दक्षिण भारतातील मेवाड येथे झाला.त्याच्या वडिलांचे नाव राणा उदयसिंह.मेवाड, बुंदेलखंड आणि सिरोही वंशातील काही राजे आपला स्वाभिमान,धर्म आणि स्वतंत्रता टिकवून ठेवण्यासाठी अकबराशी प्राणपणाने लढले.पुढे उदयसिंह मेवाडचे राजा झाले.चित्तोडच्या युद्धानंतर चार वर्षांनी दिनांक ३ मार्च १५७२ ला उदयसिंहांचे निधन झाले.यानंतर मेवाडचे संपूर्ण सुत्रे महाराणा प्रतापसिंह यांच्याकडे आले व त्यांचा राज्याभिषेक झाला.ज्यांचे नाव घेतल्याने सर्वांनाच स्फुर्ती येते असे महान तेजस्वी योध्दा म्हणजे महाराणा प्रताप.महाराणा प्रतापांनी प्रतिकुल परिस्थितीतही स्वतःच्या जीवाची पर्वा न करता मेवाडचे रक्षण केले. जयपूरचा राजा मानसिंग याने अकबरापासुन आपल्या राज्याला धोका पोहोचू नये म्हणून आपली बहीण अकबराला देऊन सोयरिक केली.अकबराने मेवाडला आपल्या अधिपत्याखाली आणण्यासाठी मानसिंहाला मेवाडला जाण्यास सांगितले.त्या निमित्ताने मानसिंग दिल्लीला जात असताना वाटेत मुद्दाम आपल्या वैभवाचे प्रदर्शन करण्याकरिता कुंभगडावर असलेल्या महाराणा प्रतापसिंह यांच्या भेटीस गेला.महाराणा प्रताप यांनी त्यांचा आदरसत्कार केला. परंतु मानसिंगच्या पंक्तीत बसून जेवण्यास नकार दिला. मानसिंहाने याचे कारण विचारले.यावर महाराणा प्रताप म्हणाले स्वतःच्या समशेरच्या बळावर आपल्या राज्याचे रक्षण करण्याऐवजी जे राजपूत आपल्या मुली-बहिणी मोगलांना देऊन त्यांच्यापासून राज्य रक्षण करतात,अशा अस्वाभिमानी राजपुतांच्या पंक्तीला मी बसत नाही.मी जर आपणासोबत जेवण केले तर बाप्पा रावळ,राणा सांगा, ह्या सारख्या थोर वंशाला काळीमा फासण्यासारखे होईल.हे ऐकून मानसिंहाच्या मनात खटकले आणि महाराणा प्रतापसिंह यांना धमकी देत म्हणाला महाराणा प्रतापसिंहजी आज आपण माझा अपमान केला ह्याचा बदला रणांगणात अवश्य घेईल व मानसिंह काय आहे हे दाखवून देईल.असे म्हणून तेथुन निघुन गेला आणि मानसिंह व महाराणा प्रतापसिंह यांच्यात कट्टर वैरत्व निर्माण झाले.ही घटना अती शिगेला पोहोचली व युध्दात रूपांतर झाली.राणाजींचे वक्तव्य नेहमीच मानसिंहाच्या मनाला खटकत होते.ही संपूर्ण घटना मानसिंहाने अकबराला सांगितली. पहिलेच मानसिंह तिलमिला झालेला होता आणि अकबराला मेवाड पाहिजे होते.याकरीता अकबर सर्वत्र जहर घोळण्याचे काम करीत होता.अशा परिस्थितीत अकबराने मानसिंहाच्या नेतृत्वाखाली दोन लाख प्रचंड सैन्य आणि अकबराचा मुलगा सलीम याला घेऊन हल्दीघाटीच्या दिशेने महाराणा प्रताप यांच्याशी युद्ध करायला निघाला.ही बातमी महाराणा प्रतापसिंह यांना कळताच त्यांनी आपले बावीस हजार सैन्य घेऊन अरवली पर्वताच्या कुंभलगड वाटेने जाणाऱ्या मानसिंहाच्या सैन्यावर बाणांनी छुपे हल्ले करून बरेचसे सैनिक धाराशाही केले.दोन लाख सैन्याशी बावीस हजार सैन्य लढा देत होते.महाराणा प्रतापसिंह यांच्या तलवारीचा वार अकबराचा मुलगा सलीमवर बसणार



तितक्यात सलिमचा हत्ती हालला आणि तो तलवारीचा वार हत्तीवर बसला आणि सलिम वाचला.महाराणा प्रतापसिंहांच्या भितीने मानसिंह आपल्या सैन्यासह पिछाडीवर रहाला. हे घनघोर युद्ध अनेक दिवस चालले. राणाजी आपल्या तलवारीने वेढा कापत सामोरं जाण्याचा प्रयत्न करू लागले.महाराणा प्रतापसिंह जखमी झालेले पाहून मानसिंह अत्यंत दु:खी झाला.आपण कुठेतरी चुकत आहोत हे त्यांच्या लक्षात आले व मेवाडच्या रक्षणासाठी आपण येथुन निघून जाण्यास विनंती केली व प्रतापसिंहानी ती मान्य केली.प्रतापांचे छत्र आणि मुकुट मानसिंहाने स्वतः डोक्यात घातले.मानसिंहाला महाराणा प्रतापसिंह समजून मोगलांनी आक्रमण केले.अनेक मोगलांना त्यांनी ठार मारले व शेवटी विरगतीरला प्राप्त झाले.तेवढ्यातच शत्रू सैनिकांनी राणाजींचा घोडा चेतक याच्या पायावर तीर सोडून वार केला.त्याचा पाय निकामी झाला. अशाही परिस्थितीत स्वामिनिष्ठ घोड्याने वेढ्याचा भेद करून व संपूर्ण वेढा चिरत दूर निघून गेला.वाटेत एक ओढा लागला चेतकने उडी घेऊन तो ओढा पार केला आणि काही दुर जाऊन चेतकने प्राण सोडला. आपला पाठलाग कोण करीत आहे हे पहाण्यासाठी राणाप्रतापांनी मागे फिरून पहिले,तर अकबराला जाऊन मिळालेला आपला धाकटा भाऊ शक्तीसिंह व त्यांच्या बरोबर चार-पाच मोगल सैनिकांना जिवे मारीत होता.राणाजी हे दृश्य पाहून अचंबित झाले.यानंतर शक्तीसिंह राणाजींजवळ आले आणि त्यांना आलिंगन देऊन म्हणाला दादा तुझ्या सारखे शौर्य आणि कणखर मन यांच्या अभावामुळे मी जरी मोगलांची सरदारकी करीत असलो तरी तूच माझा आदर्श आहे.या हल्दीघाटीच्या युद्धानंतर अकबराने महाराणा प्रतापसिंह यांच्यावर अनेक आक्रमणे केली.मात्र अकबर महाराणा प्रतापसिंह यांना पराभूत करू शकला नाही. हल्दीघाटी हे इतिहासातील सर्वात मोठे युद्ध मानल्या जाते.प्रतापांना हरविण्यासाठी शेवटचा उपाय म्हणून अकबराने पराक्रमी योद्धा जगन्नाथला मोठ्या सेनेसह १५८४ मध्ये मेवाडवर आक्रमक करण्यास पाठविले. परंतु २ वर्षे अथक प्रयत्न करूनही तो महाराणा प्रतापसिंह यांना पकडू शकला नाही किंवा हरवू शकला नाही.अशाप्रकारे प्रबळ महत्त्वाकांक्षी, दृढनिश्चयी, धैर्यशील, उज्वल कीर्तीवंत आणि साहसी अशा महाराणा प्रतापसिंहाला शमविण्याचा प्रयत्न अकबराने केला पण सर्व प्रयत्न निष्फळ ठरले.२१ जून १५७६ रोजी चेतकने (घोड्याने) महाराणा प्रतापसिंहांना निरोप दिला.आजही हल्दीघाटी येथील राजसमंद येथे चेतकची समाधी आहे.त्याकडे पहाणारे सर्वच प्रतापांच्या मूर्तीप्रमाणेच श्रध्देने पाहतात.१९ जानेवारी १५९७ रोजी महाराणा प्रतापसिंह यांची प्राणज्योत मावळली.भारतीय इतिहासात महाराणा प्रतापसिंहाचे नाव राष्ट्र, धर्म, संस्कृती, स्वाभिमान यासाठी आजही मानाने घेतले जाते.जोपर्यंत सुर्य-चंद्र, आकाश-पाताळ आहे तोपर्यंत प्रतापांचे नाव अमर राहील. परमप्रतापी महाराणा प्रतापसिंहांना जयंती निमित्त कोटी-कोटी प्रणाम! जय हिंद!

**– रमेश कृष्णराव लांजेवार,** ( स्वतंत्र पत्रकार), मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# बिबट्या आला रे आला?

सध्या महाराष्ट्रात जिकडेतिकडे बिबट्या प्रकरण गाजत आहे. तसं पाहिल्यास बिबट्यानं सर्वत्र धुमाकूळ घातलेला आहे व आता बिबट्या विधानसभेतही शिरला आहे व प्रत्येकजण म्हणत आहे की बिबट्या आला रे आला. अन् तसं म्हणणं चुकीचंही नाही. कारण बिबट्या लोकांना दिसत आहे आणि तो लोकांवर हल्लेही करीत आहे.

बिबट्या वस्तीत आला. त्याने वस्तीत धुमाकूळ घातला. त्यानं माणसांवर हल्ला केला. त्यानं माणसं मारली. हे सारच बरोबर आहे. परंतु तो वस्तीत का आला? यावर विचार केल्यास असं जाणवतं की त्याच्या अधिवासाची जंगलं नष्ट झाली. कोणी केली तर ती मानवानं केली. कोणत्या मानवानं केली? जो त्या जंगलाच्या परिसरात राहतो, त्या माणसानं की जो तिथं राहात नाही, त्या माणसानं. अर्थातच जो त्या जंगलाजवळ राहात नाही, त्या माणसानं जंगलं नष्ट केलीत. अर्थातच तो जंगल नष्ट करणारा माणूस हा एखादा कंत्राटदार असतो की तो त्या जंगलाच्या गावाजवळ राहात नाही. तो जंगल नष्ट करतो, आपल्या स्वार्थासाठी. कारण त्याला त्या जंगलातील लाकूड विकून व्यापार करायचा असतो. एवढंच नाही तर ते जंगल नष्ट करायला कारणीभूत असतो त्या भागातील मंत्री. ज्याला त्या जंगलातील लाकडापासून मिळणाऱ्या पैशातून कमीशन मिळत असतं. मात्र जंगल नष्ट ज्या भागातील होतं. त्या माणसांना त्या जंगलकटाईपासून नुकसानच होत असतं.

जंगलं ही सृष्टीची नैसर्गिक देण आहे. सृष्टीनं निर्माण केलेली वनसंपदा अर्थातच वन्यजीव सुरक्षीत राहावेत. म्हणूनच निसर्ग व सृष्टी निर्माण करतांना विधात्यानं जंगलं निर्माण केली. परंतु जर माणूस त्यात कुत्रीमता आणत असेल आणि जंगलं नष्ट करीत असेल तर सृष्टी ही ते जंगल नष्ट करणाऱ्यांचा कोणत्या ना कोणत्या प्रकारे विनाश करेलच. जे बिबट्याच्या आगमनानं कळून येत आहे.

परीवर्तन ही काळाची गरज आहे. याबाबतीत विचार केल्यास जंगल नष्ट होणारच. ते मानव नष्ट करणारच. कारण त्याचा त्यात स्वार्थ आहे. अन् त्याची झळ ज्याचा त्यात दोष नाही, त्यालाही



पोहोचणारच. मग त्यात त्याचा दोष नसला तरी निसर्ग ते पाहात नाही वा सृष्टीनिर्माता ते पाहात नाही. सृष्टीनिर्माता हेच पाहतो की जरी त्याचा दोष नसेल तरी तो एक मानव आहे. तसं माणसाचंही चुकतंच.

माणूस हा एक अती सृष्टीतील हुशार घटक. त्यानं सृष्टीतील वेगवेगळ्या घटकांवर नियंत्रण मिळवलंय. ज्यात त्यानं आता दगडालाही जीव फोडलाय, असं म्हणायला काहीही हरकत नाही. त्यानं पृथ्वीच्या गर्भात कितीतरी दूरपर्यंत शिरुन पृथ्वीचा अभ्यास केलाय. त्यानं आकाशात कितीतरी दूरवर जावून आकाशाचा अभ्यास केलाय. त्यानं कितीतरी अजस्र प्राण्यांवर ताबा मिळवून त्यांना नियंत्रणात आणलंय. परंतु हे जरी खरं असलं तरी तो संबंध सृष्टीला नियंत्रणात आणू शकत नाही. त्याचं मुर्तीमंत उदाहरण म्हणजे हा वस्तीत येणारा बिबट्या. निसर्ग या माध्यमातून सांगतोय की तुम्ही मानव अती हुशारही असाल, तरी मला नियंत्रणात आणू शकत नाही. अन् तसा प्रयत्न जरी केला तर मी तुम्हालाच नष्ट करुन टाकीन. हवाही लागू देणार नाही. हाच निसर्गाचा विचार. म्हणूनच निसर्ग कधी कोरोना रुपानं तर कधी बिबट्या रुपानं, कधी भुस्खलन रुपानं तर कधी पूर रुपानं, कधी शेतीचं नुकसान तर कधी भुकंप. या सर्वच प्रकारानं नुकसान करीत असतो. आपणच निसर्गाला ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न करीत असल्यानं व त्यांचेशी छेडछाड करण्याचा प्रयत्न करीत असल्यानं निसर्ग आपल्याशी छेडछाड करतो. तो स्वतः येत नाही आपली छेडछाड करायला. परंतु माध्यम मात्र पाठवून देत असतो. ज्यात मानवाला नष्ट करण्याचं माध्यम कधी एखादा आजार ठरतो तर कधी एखादी आपत्ती. ज्यातून मानव नष्ट होतो.

महत्वपुर्ण बाब ही लक्षात घेण्यासारखी आहे की आपण निसर्गावर अंमल करु शकत नाही. आपण निसर्गातील वस्तू ऑष्ट करण्याचा प्रयत्न केल्यास निसर्गही काही काळानं आपला चमत्कार दाखवतोच. ज्यात बिबट येण्यासारख्याही घटना घडतातच. हा फक्त ट्रेलर आहे, बिबट्या आला रे आला या निसर्गाच्या चित्रपट निर्माण करणाऱ्या घटनेचा. निसर्ग जेव्हा खरा चित्रपट निर्माण करेल ना. तेव्हा मात्र विचार करायला सवडही मिळणार नाही. असं असतांना निसर्गातील अस्तित्वात असलेल्या वस्तू का नष्ट कराव्यात? त्याही करु नये म्हणजे झालं. विचार करायला हवा की आज आपण जंगलं नष्ट केली व भरपूर पैसे कमवलेही. आपल्याला लाभही झाला. तरीही उद्याला येणारी आपलीच पिढी आपल्याला माफ करणार नाही. ती कोसत राहील. कारण आज बिबट्या मानवी वस्तीत फिरत आहे. उद्या बिबट्यासारखे कितीतरी हिंसक प्राणी मानवी वस्तीत फिरतील. बिबट्या वस्तीत येणं त्याचंच उदाहरण. शिवाय बिबट्या असा प्राणी की जो झाडावर, पाण्यात, घरात, शहरात कुठेही राहू शकतो. तोच पुढं सर्वेसर्वा असेल. तोच आपलं अधिराज्य गाजवू शकेल मानवी वस्तीत. अन् मानवाला अहोराज्य असेल मानवी वस्तीत. त्यातच मानवाला पळायला भुईही सापडणार नाही.

**– अंकुश शिंगाडे,** नागपूर
९३७३३५९४५०

# फलंदाजांची हाराकिरी आणि स्वैर गोलंदाजी

भारतीय क्रिकेट संघ जगातील एक बलाढ्य क्रिकेट संघ म्हणून ओळखला जातो. त्यामुळे भारतीय संघाला हरवणे ही तशी सोपी गोष्ट नसते त्यात जर मालिका भारतात असेल तर भारतीय संघाला हरवणे ही जवळपास अशक्यप्राय गोष्ट पण हा झाला भुतकाळ. आता भारतीय संघाला भारतात येऊन कोणीही सहज हरवू शकतो हे न्यूझीलंड संघाने सिद्ध केले. न्यूझीलंड संघ सध्या भारताच्या दौऱ्यावर असून भारतीय संघासोबत तो तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळला. या मालिकेतील पहिला सामना भारतीय संघाने सहज जिंकत मालिका आपणच घशात घालणार अशा आविर्भावात उरलेले दोन सामने खेळला आणि तिथेच घात झाला. पहिल्या सामन्यात पराभूत झालेल्या न्यूझीलंड संघाने उरलेल्या दोन सामन्यात भारतीय संघाला सहज हरवले आणि मालिका २ - १ ने जिंकत इतिहास घडवला. न्यूझीलंड संघासाठी हा मालिका विजय ऐतिहासिकच आहे कारण न्यूझीलंडने पहिल्यांदाच भारताला भारतात हरवून मालिका जिंकण्याचा पराक्रम केला. त्यांच्या डॅरिल मिचेल या फलंदाजाने सलग दोन सामन्यात शतक झळकावले तसेच पहिल्या सामन्यात ८५ धावांची खेळी करून भारतीय गोलंदाजांची पिसे काढली. त्यांच्या इतर फलंदाजांनीही त्याला चांगली साथ दिली. त्यांच्या गोलंदाजांनी आपल्या फलंदाजांना मोक्याच्या वेळी बाद करून न्यूझीलंड संघाला मालिका विजय मिळवून दिला. न्यूझीलंडच्या या मालिका विजयाने क्रिकेट प्रेमींना धक्का बसला असला तरी क्रिकेट जाणकारांसाठी मात्र भारताचा हा पराभव अपेक्षितच होता कारण गेल्या काही वर्षात कसोटी असो की एकदिवसीय मालिका भारतीय संघ परदेशी संघापुढे लोटांगण घालत आहे. याआधी दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया या संघाने भारताला भारतात येऊन कसोटी किंवा एकदिवसीय मालिकेत नमवले आहे. परदेशी संघ भारतात येऊन भारतीय संघाला धूळ चारत असतानाही भारतीय संघाच्या कामगिरीत कोणतीही सुधारणा होत नाही हे विशेष. भारतीय संघाचा सातत्याने पराभव होत असतानाही निवड समिती असो की बीसीसीआय, खेळाडू असो की संघ



व्यवस्थापन याचे विश्लेषण किंवा पराभवाचे आत्मचिंतन करत नाही. न्यूझीलंडने भारतावर मिळवलेला विजय फलंदाजांची हाराकिरी आणि स्वैर गोलंदाजीमुळे झाला आहे हे कोणीही सांगेल. न्यूझीलंड संघाने तीनही सामन्यात जवळपास ३०० च्या वर धावा काढल्या याचाच अर्थ भारतीय गोलंदाजांची त्यांनी यथेच्छ धुलाई केली. भारतीय संघात हर्षित राणा आणि प्रसिद्ध कृष्णा या गोलंदाजांना का खेळवण्यात येत आहे असा प्रश्न पडतो कारण या दोन्ही गोलंदाजांची प्रत्येक सामन्यात यथेच्छ पिटाई होते. संपूर्ण मालिकेत या दोन्ही गोलंदाजांनी खूप धावा दिल्या जवळपास एका षटकात ७ च्या सरासरीने त्यांनी धावा दिल्या हे फक्त न्युझीलंड विरुद्धच्या मालिकेतच घडले असे नाही तर याआधीही त्यांना असाच मार पडला आहे तरीही त्यांना खेळवण्याचा अट्टाहास केला जातो. प्रशिक्षक गौतम गंभीर यांचे ते लाडके असल्याने त्यांना संधी दिली जाते का ? हा प्रश्न पडतो. एकीकडे खूप मार खाऊनही त्यांना संघात स्थान दिले जातेय तर मोहम्मद शमी सारखा दर्जेदार गोलंदाज सातत्याने चांगली गोलंदाजी करूनही त्याच्याकडे दुर्लक्ष केले जाते. मोहम्मद शमीला का डावलले जाते याचे उत्तर निवड समिती आणि संघ व्यवस्थापनाने द्यायला हवे. रवींद्र जडेजा हा भारताचा अष्टपैलू खेळाडू पण एकदिवसीय सामन्यात त्याने अपवादात्मक परिस्थितच अष्टपैलू खेळ केला आहे. एकदिवसीय सामन्यात भारतात अर्धशतक झळकावून त्याला जमाना झाला. गोलंदाजीतही त्याची धार कमी झाली आहे. कुलदीप यादवच्या फॉर्म ही हरवला आहे. या मालिकेत जसप्रीत बुमरा आणि हार्दिक पांड्याची उणीव भारताला जाणवली. या मालिकेत कोहलीने अपेक्षित धावा काढल्या मात्र त्याला इतर फलंदाजाकडून साथ मिळाली नाही. रोहित शर्माने सुरुवात धडाकेबाज केली पण मोठी खेळी करण्यात त्याला अपयश आले. शुभमन गिलने दोन अर्धशतके झळकावली पण त्याला अर्धशतकाचे रूपांतर शतकात करता आले नाही. के एल राहुलने पहिल्या सामन्यात शतक झळकावले पण पुढच्या दोन सामन्यात त्याला खास काही करता आले नाही एकूणच विराट कोहली वगळता एकही खेळाडू आपल्या लौकिकास साजेसा खेळ करु शकले नाही त्यामुळेच भारताला हा पराभव स्वीकारावा लागला आहे. भारतीय संघाला सातत्याने मिळत असलेल्या अपयशाचे आत्मचिंतन भारतीय संघाने, निवड समितीने आणि संघ व्यवस्थापनाने करायला हवे. जर पराभवाचे आत्मचिंतन केले नाही तर भविष्यातही या पराभवाची पुनरावृत्ती होऊ शकते याचे भान भारतीय संघाने ठेवावे.

**– श्याम ठाणेदार,** दौंड जिल्हा पुणे,
९९२२५४६२९५

# गुरु तेग बहादूर आणि संत नामदेव : मूलभूत विचारांची समानता

हिंद दी चादर नांदेड येथे श्री गुरु तेग बहादूर साहिब यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त विशेष उपक्रम राबविण्यात येत असून, भारतीय सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरा ही विविध संत, गुरू आणि विचारवंतांच्या योगदानातून समृद्ध झालेली आहे. या परंपरेत महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचे अग्रणी संत नामदेव महाराज (इ.स. १२७०-१३५०) आणि शीख धर्माचे नववे गुरु, श्री गुरु तेग बहादूर साहिब (इ.स. १६२१-१६७५) हे दोन युगपुरुष वेगवेगळ्या काळात जन्मले. या दोघांमध्ये सुमारे तीन शतकांचे कालांतर असले, तरी त्यांच्या जीवनकार्याचा आणि तत्त्वज्ञानाचा अभ्यास केल्यास मूलभूत विचारधारेत लक्षणीय समानता आढळून येते. ही समानता अधोरेखित करण्याच्या दृष्टीने नांदेड येथे आयोजित करण्यात येणारा हिंद दी चादर हा विशेष उपक्रम महत्त्वपूर्ण ठरतो.

संत परंपरेचा समान मूल्याधिष्ठान संत नामदेव महाराजांनी आपल्या अभंगांच्या माध्यमातून भक्ती, सत्य, साधेपणा आणि मानवी समता यांचा पुरस्कार केला. त्यांनी जात, वर्ण आणि कर्मकांडांवर आधारित भेदभावाला ठाम विरोध केला. ईश्वर सर्वत्र आहे ही भावना त्यांच्या विचारांचे केंद्रबिंदू होती.

त्याचप्रमाणे श्री गुरु तेग बहादूर साहिब यांनीही ईश्वर एक असून तो सर्व मानवांचा आहे, असा सार्वत्रिक दृष्टिकोन मांडला. त्यांनी धार्मिक असहिष्णुता, अन्याय आणि जबरदस्तीविरुद्ध उभे राहून मानवमूल्यांचे संरक्षण केले. निर्भयता, सत्यनिष्ठा आणि बलिदान संत नामदेव महाराजांनी सामाजिक अन्यायाविरोधात निर्भयपणे आवाज उठविला. सत्य आणि नामस्मरण हाच खरा धर्म असल्याचे त्यांनी आपल्या रचनांमधून स्पष्ट केले.

श्री गुरु तेग बहादूर साहिब यांनी सत्य, धर्मस्वातंत्र्य आणि मानवी स्वाभिमान यांसाठी सर्वोच्च बलिदान दिले. त्यांनी स्वतःच्या धर्मापुरते मर्यादित न राहता इतर धर्मीयांच्या हक्कांसाठी प्राणांची आहुती दिली. त्यामुळे त्यांना हिंद दी चादर म्हणून गौरविण्यात येते.

मानवी स्वातंत्र्य आणि आत्मसन्मान संत नामदेवांनी माणसाच्या अंतःकरणातील शुद्धता आणि आत्मसन्मान




यांना सर्वोच्च स्थान दिले. बाह्य आडंबरांपेक्षा अंतर्गत भक्ती व नैतिकता महत्त्वाची असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

गुरु तेग बहादूर साहिब यांनी व्यक्तिस्वातंत्र्य, विशेषतः धार्मिक स्वातंत्र्य, हा मानवी जीवनाचा मूलभूत अधिकार असल्याचा संदेश आपल्या आचरणातून दिला.

**हिंद दी चादर उपक्रमाचे महत्त्व**

नांदेड येथे श्री गुरु तेग बहादूर साहिब यांच्या ३५० व्या शहीदी शताब्दी समागमानिमित्त आयोजित करण्यात येणारा हिंद दी चादर हा विशेष उपक्रम केवळ धार्मिक कार्यक्रम नसून सामाजिक सलोखा, राष्ट्रीय एकात्मता आणि सर्वधर्मसमभाव यांचा संदेश देणारा आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून गुरु तेग बहादूर साहिब यांच्या त्याग, बलिदान व मानवतावादी विचारांचा प्रसार करण्यात येत असून, त्याचबरोबर महाराष्ट्राच्या संत परंपरेतील संत नामदेव महाराजांच्या विचारांशी असलेली वैचारिक समानता अधोरेखित करण्यात येत आहे.

**सामाजिक सलोखा व राष्ट्रीय एकात्मता**

संत नामदेव महाराज आणि गुरु तेग बहादूर साहिब यांच्या विचारधारेमुळे समाजात सहिष्णुता, बंधुता आणि समतेची भावना दृढ झाली. या दोन्ही महापुरुषांचे विचार आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीतही मार्गदर्शक ठरतात.

हिंद दी चादर या उपक्रमातून विविध धर्म, पंथ आणि समाजघटकांमध्ये परस्पर सन्मान व समन्वयाची भावना वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

संत नामदेव महाराज आणि श्री गुरु तेग बहादूर साहिब यांच्यात जरी तीन शतकांचे कालांतर असले, तरी सत्य, निर्भयता, मानवी स्वातंत्र्य, सामाजिक समता आणि ईश्वरभक्तीची सार्वत्रिक भावना ही दोघांच्या विचारधारेची समान सूत्रे आहेत. नांदेड येथे आयोजित हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त विशेष उपक्रम हा या महान परंपरेचे स्मरण करून देणारा व भावी पिढीसाठी प्रेरणादायी ठरणारा उपक्रम आहे.

**– प्रभाकर बारहाते,**
प्र.जिल्हा माहिती अधिकारी, हिंगोली

## 'न्याय फक्त गरिबांसाठीच का?'

# पालकमंत्री शिरसाठांच्या मुलीला पोलिसांचे अभय? इम्तियाज जलील यांचा घणाघात!

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**/महापालिका निवडणुकीच्या निकालानंतर शहरात विजयाचा जल्लोष सुरू असतानाच, आता 'कायद्याच्या समानते'वरून मोठा वाद पेटला आहे. एकाच गुन्ह्यासाठी एका नगरसेवकावर कारवाई, तर पालकमंत्र्यांच्या मुलीला वेगळा न्याय का? असा संतप्त सवाल एमआयएमचे नेते इम्तियाज जलील यांनी उपस्थित केला आहे.

काय आहे नेमकं प्रकरण?

महानगरपालिका निवडणुकीत विजयी झाल्यानंतर शहरात विविध ठिकाणी विजय रॅली काढण्यात आल्या. यावेळी नियमांची पायमल्ली झाल्याचे समोर आले आहे.अभिजीत जीवनवाल (नगरसेवक, शिंदे गट): यांनी मिरवणुकीत तलवार नाचवली आणि पराभूत उमेदवाराच्या घरासमोर शक्तीप्रदर्शन केले. याप्रकरणी वेदांत नगर पोलीस ठाण्यात तातडीने गुन्हा दाखल करण्यात आला. हर्षदा शिरसाठ (नगरसेविका व पालकमंत्री संजय शिरसाठ



यांची कन्या): यांच्याही विजयी रॅलीत उघडपणे तलवारी नाचवण्यात आल्याचे व्हिडिओ व्हायरल झाले. मात्र, धक्कादायक बाब म्हणजे अद्याप त्यांच्यावर किंवा त्यांच्या समर्थकांवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

इम्तियाज जलील यांची आक्रमक भूमिका

पोलिसांच्या या दुटप्पी भूमिकेवर प्रहार करताना इम्तियाज जलील म्हणाले की, कायदा काय फक्त सामान्य आणि गरीब नगरसेवकांसाठीच आहे का? पालकमंत्र्यांची मुलगी असली की कायद्याचे हात आखडते का घेतले जातात? एका नगरसेवकावर गुन्हा दाखल होतो, मग हर्षदा शिरसाठ आणि त्यांच्या पीएवर मेहेरबानी का?

श्रीमंत आणि सत्ताधाऱ्यांसाठी वेगळा न्याय आणि गरिबांसाठी वेगळा कायदा, हे आम्ही खपवून घेणार नाही. याबद्दल मी पोलिसांना जाब विचारणार आहे. - इम्तियाज जलील (माजी खासदार, MIM[2])

शिरसाठांचे वर्चस्व की सत्तेचा दबाव?

पालकमंत्री संजय शिरसाठ यांनी आपली दोन्ही मुले-हर्षदा आणि सिद्धांत-यांना निवडून आणत महापालिकेत आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. मात्र, विजयाचा हा गुलाल उधळत असतानाच 'तलवार प्रकरणा'ने त्यांच्या प्रतिमेवर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. पोलिसांवरील राजकीय दबाव की प्रशासनाची दिरंगाई, यामुळे शहरात चर्चेला उधाण आले आहे.

## 'हिंद-दी-चादर' सोहळ्यासाठी नांदेड सज्ज; १० लाख भाविक येणार!

नांदेड: शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या 'शहीदी समागम' सोहळ्यासाठी नांदेड नगरी सज्ज झाली आहे. २४ आणि २५ तारखेला होणाऱ्या या ऐतिहासिक कार्यक्रमासाठी देश-विदेशातून सुमारे १० लाख भाविक येण्याची शक्यता विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी वर्तवली आहे. प्रशासनाने सूक्ष्म नियोजन केले असून भाविकांसाठी ८ ठिकाणी अखंड लंगर, निवास आणि आरोग्य सुविधा सज्ज केल्या आहेत. या सोहळ्याला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## संक्षिप्त

### जैनम महिला मडळानी घेतले पालीताना तीर्थक्षेत्राचे दर्शन



**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती सभाजिनगर /प्रतिनिधी**/ जैनम महिला मंच वतीने नेहमी सामाजिक व जनकल्याणकारी उपक्रम राबविले जातात याच अंतर्गत महिलांना धार्मिक तिर्थक्षेत्रा ची माहिती व दर्शन व्हावे या निमित्ताने संभाजीनगर ते पालीतांना गुजरात तीर्थक्षेत्र येथे एक यात्रा काढण्यात आली यात्रा २५ वर्षापर्यंत ९० वर्षापर्यंतच्या महिलांच्या सहभाग होता तसेच यामध्ये १५० महिलांनी सहभाग नोंदवला होता सुरत ते भावनगर रोप वे चा महिलांनी आनंद घेतला पालिताना तीर्थक्षेत्र येथे महिलांनी भगवंताची पूजा व आरती केली तसेच अंगलोट शंकेश्वर नीलकंठधाम कुबेरधाम स्टॅच्यू ऑफ युनिटी आधी स्थळे पाहिली यात्रा यशस्वी करण्यासाठी भारती बागरेचा संगीता संचेती ललिता साकला नंदा मुथा करुणा साहुजी कविता अजमेरा अर्चना दुगड राखी बोरा कमलाबाई आचलीया रेश्मा कोठारी आशा कासलीवाल भावना सेठीया निर्मला मुथा आदींनी परीश्रम घेतले यावेळी भारती बागरेचा यानी सागितलं की पालीताणा हे गुजरात राज्यातील भावनगरजवळ असलेले जैन धर्माचे एक पवित्र तीर्थक्षेत्र आहे, जे शत्रुंजय पर्वतावर वसलेले आहे आणि येथे ९०० हून अधिक सुंदर संगमरवरी मंदिरे आहेत, ज्यात आदिनाथ (ऋषभदेव) आणि इतर तीर्थंकरांना समर्पित मंदिरे आहेत; हे ठिकाण जगातील एकमेव शाकाहारी शहर म्हणूनही ओळखले जाते आणि जैन भाविकांसाठी अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. अशी माहिती नरेंद्र अजमेरा पियुष कासलीवाल यानी दिली

### खानापूरच्या सुमय्या शेखची गरुडझेप; प्रतिकूलतेवर मात करत महाराष्ट्र बँकेच्या अधिकारी पदाला गवसणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**देगलूर /प्रतिनिधी**/ घरात कोणताही शैक्षणिक किंवा बँकिंग क्षेत्राचा वारसा नसताना, आर्थिक परिस्थिती बेताची असतानाही जिद्द, सातत्य आणि आत्मविश्वासाच्या जोरावर खानापूर येथील सुमय्या शेख हिने बँकिंग क्षेत्रात ऐतिहासिक यश मिळवले आहे. पहिल्याच प्रयत्नात राष्ट्रीयकृत असलेल्या महाराष्ट्र



बँकेच्या उपशाखाधिकारी पदावर तिची निवड झाली असून ग्रामीण भागातील, विशेषतः खानापूर गावातील बँकिंग क्षेत्रात अधिकारी पद गाठणारी ती पहिली महिला ठरली आहे.

प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढत सुमय्या शेख हिने बँकिंग क्षेत्रात करिअर करण्याचा निर्धार केला. कोणतीही खासगी शिकवणी न लावता, स्वतःच्या अभ्यासाच्या बळावर आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवत तिने स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली. सातत्यपूर्ण अभ्यास, कठोर परिश्रम आणि आत्मविश्वास या त्रिसूत्रीचा अवलंब करत तिने अखेर यशाला गवसणी घातली. इन्स्टिट्यूट ऑफ बँकिंग पर्सोनल सिलेक्शन बोर्डातर्फे १० ऑक्टोबर रोजी घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेचा निकाल गुरुवारी, १५ तारखेला जाहीर झाला असून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातून सुमय्या गौस शेख हिची महाराष्ट्र बँकेत उपशाखाधिकारी पदावर निवड जाहीर झाली.

सुमय्या शेख हिने प्राथमिक शिक्षण खानापूर येथील जिल्हा परिषद शाळेत घेतले, तर माध्यमिक शिक्षण साधना हायस्कूलमधून पूर्ण केले. पुढील शिक्षणासाठी तिने लातूर येथील राजश्री शाहू महाविद्यालयातून वाणिज्य शाखेची पदवी विशेष प्राविण्यासह प्राप्त केली. पदवी शिक्षणानंतर बँकिंग क्षेत्रात करिअर करण्याचा ठाम निर्णय घेऊन तिने स्वतःच्या मेहनतीवर अभ्यास सुरू ठेवला आणि त्याचे फलित आज अधिकारी पदाच्या रूपाने तिच्या हाती आले आहे. या यशामागे कुटुंबाचाही मोठा वाटा आहे. तिची मोठी बहीण आयेशा बेगम गौस शेख हिची लोकसेवा आयोगामार्फत गतवर्षीच बृहन्मुंबई महानगरपालिकेत कार्यकारी सहाय्यक पदावर निवड झाली असून तिच्या मार्गदर्शनाचा सुमय्याला लाभ झाला. तर लहान भाऊ मुजफ्फर शेख हा होमिओपॅथी शाखेचे शिक्षण घेत आहे. सुमय्याच्या यशामुळे खानापूर परिसरात आनंदाचे वातावरण असून गावकऱ्यांनी तिचा विशेष सत्कार करून अभिनंदन केले.

## नालंदा बी.सी.ए. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या सातदिवसीय विशेष शिबिराचे उत्साहात उद्घाटन

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** सिल्लोड शिक्षण संस्था संचलित, नालंदा बी.सी.ए. महाविद्यालय, एन-११ हडको, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजनेच्या सातदिवसीय विशेष श्रमदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन ओव्हरगांव (सुभाषनगर), ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथे दि. १९ जानेवारी २०२६ रोजी दिमाखात पार पडले.

या विशेष शिबिराचे उद्घाटन सिल्लोड शिक्षण संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब म्हस्के यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मा. दादासाहेब म्हस्के यांनी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षपद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रविण मस्के यांनी भूषविले.या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सुभाषनगर गावाचे उपसरपंच श्री. संदीप बाबुलाल देहाडे, श्रीमती मनिषा संदीप देहाडे आणि श्रीमती सुलोचना भिमराव केदारे यांची उपस्थिती होती. तसेच प्रमुख वक्ते म्हणून प्रा. समाधान दहिवाळ उपस्थित होते. कार्यक्रमासाठी प्रा. योगेश नरवडे व सुधीर बनकर यांची विशेष उपस्थिती लाभली.

उद्घाटनानंतर मा. दादासाहेब म्हस्के यांनी ग्रामस्थांना संत गाडगेबाबा यांच्या जीवनकार्याबद्दल माहिती दिली आणि त्यांच्या हस्ते गावामध्ये वृक्षारोपण करण्यात आले. प्रमुख वक्ते प्रा. समाधान दहिवाळ यांनी विद्यार्थ्यांच्या जीवनातील राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व पटवून दिले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. प्रविण मस्के यांनी शिबिराचे उद्दिष्ट स्पष्ट करताना स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, आरोग्य जनजागृती आणि बालविवाह निर्मूलन यांसारख्या सामाजिक विषयांवर विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.शिबिराच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांनी गावामध्ये ग्रामस्वच्छता केली आणि जनजागृतीसाठी रॅली काढली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. जयश्री राठोड यांनी केले. सुत्रसंचालन प्रा. मनिषा राकडे यांनी केले, तर आभार प्रा. योगेश नरवडे यांनी मानले.

## गाजगाव येथील मिळकतीचे स्वतंत्र पी.आर. कार्ड मिळावे; गुलाब शहा यांची भूमि अभिलेख कार्यालयाकडे मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर (प्रतिनिधी)** गाजगाव येथील आपल्या मालकीच्या जागेचे नमुना नंबर ८ प्रमाणे स्वतंत्र पी.आर. कार्ड (झीर्शिीं उरीव) तयार करून मिळावे, अशी मागणी गुलाब शहा शब्बीर शहा यांनी उपअधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, गंगापूर यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात नमूद केल्यानुसार, गाजगाव ग्रामपंचायत अंतर्गत गावठाण भागात गुलाब शहा यांची ३४,४३० चौरस फूट जागा आहे. नमुना नंबर ८ प्रमाणे या जागेचा जुना क्रमांक १४२ आणि नवीन क्रमांक १४८ असा आहे. या जागेच्या चतुःसीमा पूर्वेस सरकारी गावठाण, पश्चिमेस सरकारी रस्ता, दक्षिणेस एकनाथ बारकू जाधव व काळे यांची जागा आणि उत्तरेस सरकारी सहन जागा अशा आहेत.

गुलाब शहा यांचे म्हणणे आहे की, या जागेचे पी.आर. कार्ड (क्रमांक २२८) सध्या सामाईक करण्यात आले असून, त्यामध्ये त्यांच्या व्यतिरिक्त इतर ४ व्यक्तींची नावे समाविष्ट करण्यात आली आहेत. संबंधित व्यक्ती या त्यांच्या रक्ताच्या नात्यातील नसून केवळ शेजारी आहेत. भूमी अभिलेख कार्यालयाने ग्रामपंचायत किंवा संबंधित मालमत्ता धारकांकडून कोणतीही हरकत न घेता हे सामाईक पी.आर. कार्ड बनवले आहे, जे तांत्रिकदृष्ट्या चुकीचे आहे.

निवेदनातील मुख्य मागण्या: १. सामाईक पी.आर. कार्डातील त्रुटी दूर करून नमुना नंबर ८ च्या नोंदीनुसार स्वतंत्र पी.आर. कार्ड बनवण्यात यावे. २. कार्यालयाच्या मूळ रजिस्टरमध्ये ३४,४३० चौरस फूट जागेचे स्वतंत्र मालक म्हणून गुलाब शहा यांच्या नावाची नोंद घेण्यात यावी. ३. पी.आर. कार्ड क्रमांक २२८ मधून इतर लोकांची नावे वगळून स्वतंत्र कार्ड गावाच्या यादीत समाविष्ट करावे.या मागणीचे निवेदन गुलाब शहा यांनी प्रशासनाला सादर केले असून, यावर त्वरित कार्यवाही करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

## सत्यभामा भीमराव दिपके 'आदर्श परिचारिका' पुरस्काराने सन्मानित

**आत्ताच एक्सप्रेस**

**देगलूर/प्रतिनिधी**/समाजातील दुर्बल, वंचित व गरजू घटकांसाठी निःस्वार्थ भावनेने सातत्यपूर्ण सेवा करणारे सत्यभामा भीमराव दिपके (रा. सुंडगी) यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक, शैक्षणिक व मानवतावादी कार्याची दखल घेऊन 'आदर्श परिचारिका' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा सन्मान जेतवन सामाजिक शैक्षणिक चॅरिटेबल ट्रस्ट, सुजयतपूर यांच्या वतीने आयोजित तिसऱ्या अखिल भारतीय राष्ट्रीय महिला बौद्ध धम्म परिषद अंतर्गत प्रदान करण्यात आला. समाजातील वंचित, दुर्बल व गरजू घटकांच्या सेवेसाठी त्यांनी दाखविलेली सेवाभावी वृत्ती, प्रामाणिकपणा, संवेदनशीलता व सामाजिक बांधिलकी यामुळे त्यांची निवड या पुरस्कारासाठी करण्यात आली.




सत्यभामा दिपके यांनी आपल्या कार्यातून समाजातील दुर्बल घटकांना न्याय, सन्मान व आत्मविश्वास देण्याचे कार्य केले आहे. वैयक्तिक लाभापेक्षा समाजहिताला अग्रक्रम देत त्यांनी आरोग्य सेवा, सामाजिक मदत, शैक्षणिक जागृती व नैतिक मूल्यांची जोपासना या क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांच्या सेवेमुळे अनेक गरजू कुटुंबांना आधार मिळाला असून समाजात सकारात्मक परिवर्तनाची प्रक्रिया वेगाने पुढे सरकत आहे. त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य म्हणजे सातत्य, चिकाटी व माणुसकीची जाणीव. कोणताही भेदभाव न करता त्यांनी समाजातील सर्व स्तरांतील लोकांसाठी सेवा उपलब्ध करून दिली. त्यांच्या कार्यामुळे समाजात सेवाभावी वृत्तीचा आदर्श निर्माण झाला असून नव्या पिढीला समाजसेवेची प्रेरणा मिळत आहे. या उल्लेखनीय कार्याची दखल घेत जेतवन सामाजिक शैक्षणिक चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने त्यांना गौरवपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष सावित्री ताई शेवाळकर, कार्यक्रमाचे अध्यक्षा, प्राध्यापिका छायाताई बोरकर, व पूजनीय भंतेजी यांच्या उपस्थितीत,हा सन्मान त्यांच्या कार्याची पावती असून भविष्यात अधिक जोमाने समाजोपयोगी कार्य घडत राहावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. पुरस्कार वितरणप्रसंगी ट्रस्टचे अध्यक्ष, पदाधिकारी, मान्यवर पाहुणे, सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व स्तरांतून सत्यभामा भीमराव दिपके यांच्यावर अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत असून त्यांच्या पुढील सामाजिक व सेवाभावी कार्यासाठी सदिच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

## हजरत सय्यद जमालशाह वली (रह.) उर्स उत्सव समितीच्या अध्यक्षपदी शाकीर पटेल यांची निवड

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री (प्रतिनिधी)** फुलंब्री शहराचे ग्रामदैवत आणि सर्वधर्म समभावाचे प्रतीक मानले जाणाऱ्या हजरत सय्यद जमालशाह वली (रह.) यांचा वार्षिक उर्स सोहळा यंदा मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित बैठकीत 'उर्स उत्सव समिती'ची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून, अध्यक्षपदी शाकीर पटेल यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.उर्स कार्यक्रमाचे स्वरूप: यंदाचा उर्स सोहळा ४ दिवस चालणार आहे. यामध्ये ५ फेब्रुवारी: संदल शरीफचा कार्यक्रम,६ फेब्रुवारी: मुख्य उर्स शरीफ सोहळा,७ व ८ फेब्रुवारी: रात्री प्रसिद्ध कव्वालांच्या उपस्थितीत 'कव्वालीचा जंगी मुकाबला',नवीन कार्यकारिणी: शाकीर पटेल (अध्यक्ष) यांच्यासह इरफान शहा, मुस्ताक पटेल, फरहान शहा (उपाध्यक्ष), अशपाक पटेल (सचिव), वसीम हुसैनी (सहसचिव) आणि हुसेन खान (कोषाध्यक्ष) यांची निवड करण्यात आली आहे.

सुरक्षेच्या दृष्टीने संपूर्ण उर्स परिसर उउढत च्या निगराणीखाली असेल. तसेच, उर्सपूर्वी दर्गाह परिसराचे सुशोभीकरण करून तेथे लाद्या बसवणे आणि दोन्ही बाजूंनी भव्य मिनार उभारण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेण्यात आला आहे.या बैठकीला उपनगराध्यक्ष जमीर पठाण, संपादक इस्माईल खान, नगरसेवक आसीफ पटेल, जावेद खान आणि मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. सर्व नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन समितीने केले आहे.

## टाटा मुंबई मॅरेथॉन २०२६: ताडू अबाते डेमे आणि येशी चेकोले विजेते; भारतीयांमध्ये कार्तिक आणि संजीवनीची बाजी

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/ टाटा मुंबई मॅरेथॉनच्या २१ व्या आवृत्तीत इथिओपियाच्या धावपटूंनी आपले वर्चस्व सिद्ध केले. पुरुष गटात ताडू अबाते डेमे आणि महिला गटात येशी कलायू चेकोले यांनी एलिट गटाचे विजेतेपद पटकावले. या दोन्ही विजेत्यांना प्रत्येकी ५०,००० अमेरिकन डॉलर्सचे बक्षीस मिळाले.




**येशी चेकोलेचे स्वप्न साकार :** २०१९ पासून या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या येशी चेकोलेने २:२५:१३ सेकंद वेळेसह कारकिर्दीत पहिल्यांदाच मुंबई मॅरेथॉन जिंकली. प्रतिकूल हवामानामुळे तिला कोर्स रेकॉर्ड मोडता आला नाही, तरीही तिने चढ-उताराच्या मार्गावर सकारात्मक राहत ही कामगिरी केली. इथिओपियाच्याच किडसन अलेमाने दुसरे, तर गोजम टेसगायेने तिसरे स्थान पटकावले.

**पुरुषांच्या गटात अटीतटीची लढत :** पुरुषांच्या एलिट गटात इथिओपियाचा ताडू अबाते आणि केनियाच्या लिओनार्ड लँगट यांच्यात ४० किमीपर्यंत काट्याची टक्कर पाहायला मिळाली. शेवटच्या किलोमीटरमध्ये वेग वाढवत अबातेने २:०९:५५ सेकंदात शर्यत पूर्ण करत जेतेपदावर मोहोर उमटवली. लँगटला १५ सेकंदांच्या फरकाने दुसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले, तर मेरहवी केसेटे तिसरा आला. इथिओपियाचे हे मुंबईतील सातवे दुहेरी विजेतेपद ठरले.

**भारतीय धावपटूंचे यश: कार्तिक आणि संजीवनीचे पदार्पण गाजले :** भारतीय एलिट गटात नवख्या धावपटूंनी अनुभवावर मात केली. महिलांमध्ये संजीवनी जाधवने आपल्या पहिल्याच मॅरेथॉनमध्ये २:४९:०२ वेळेसह प्रथम स्थान मिळवले. तिने अनुभवी निर्माबेन ठाकोर (दुसरे स्थान) आणि सोनम (तिसरे स्थान) यांना मागे टाकले. ३५ किमी नंतर आपला विजय निश्चित असल्याची खात्री तिला पटली होती.

पुरुषांमध्ये रशियात प्रशिक्षण घेणाऱ्या कार्तिक करकेराने सर्वांना थक्क केले. २:१९:५५ अशी वेळ नोंदवत त्याने अनिश थापा आणि श्रीनु बुगाथा यांसारख्या दिग्गजांना मागे टाकत अव्वल स्थान पटकावले. गतविजेता अनिश थापा दुसऱ्या, तर प्रदीप चौधरी तिसऱ्या स्थानावर राहिला. भारतीय विजेत्यांना अनुक्रमे ५ लाख, ४ लाख आणि ३ लाख रुपयांची बक्षिसे देण्यात आली.

मुंबई मॅरेथॉनची ही २१ वी आवृत्ती केवळ नव्या विक्रमांसाठीच नव्हे, तर भारतीय लांब पल्ल्याच्या धावपटूंसाठी एका नव्या युगाची सुरुवात ठरली आहे.

## 'शार्ङ्गदेव'मध्ये ध्रुपदांगी कथक आणि छाऊ नृत्याचा अनोखा संगम

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**/ येथील महागामी गुरूकुल आयोजित 'शार्ङ्गदेव' महोत्सवाच्या तिसऱ्या दिवसाची संध्याकाळ भारतीय अभिजात नृत्याच्या विविध छटांनी उजळून निघाली. या सत्रात गुरू पार्वती दत्ता यांच्या मार्गदर्शनाखालील कथक आणि गुरू शिष्यधर आचार्य व त्यांच्या शिष्यांनी सादर केलेले छाऊ नृत्य रसिकांसाठी एक वैचारिक आणि दृश्यानुभव ठरला.

कथक: ध्रुपद परंपरेचे नादमय चिंतन : कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात गुरू पार्वती दत्ता आणि त्यांच्या शिष्यांनी ध्रुपदांगी परंपरेच्या पुनर्शोधावर आधारित कथकची अभ्यासपूर्ण प्रस्तुती दिली. ध्रुपद म्हणजे केवळ बंदिश नसून ते एक 'नादमय चिंतन' आणि 'तत्त्वज्ञान' आहे, हा विचार नृत्यातून प्रभावीपणे मांडण्यात आला.

अजरा: या रचनेतून सरस्वतीच्या लुप्त पण प्रवाही स्वरूपाची संकल्पना मांडत दैवी ऊर्जेचे दर्शन घडवले.

रासपंचाध्यायी: श्रीकृष्णाच्या रासलीलेचे शास्त्रीय आणि भावपूर्ण सादरीकरण करण्यात आले.

प्रबल दल साजजग: तानसेन रचित या ध्रुपद रचनेत गोवर्धन लीलेचा प्रसंग सामूहिक नृत्यातून अत्यंत ताकदीने साकारला. या सादरीकरणात कथकातील गतभाव, तालपक्ष आणि अभिनयाचा वापर करून परंपरा आणि नवसर्जन यांचा सुंदर संगम पाहायला मिळाला.

छाऊ नृत्य: ओडिसाच्या शौर्य आणि शृंगाराचे दर्शन: दुसऱ्या सत्रात गुरू शिष्यधर आचार्य आणि त्यांच्या शिष्यांनी छाऊ नृत्याच्या ओघवत्या शैलीत विविध कथापट उलगडले. त्यांच्या सादरीकरणाने प्रेक्षकांना ओडिसाच्या कलासंस्कृतीची प्रचिती दिली. कृष्ण-राधा: सुरुवातीला कृष्ण आणि राधा यांच्यातील अलौकिक प्रेमसंबंधांवर आधारित नृत्य सादर झाले.

चंद्रभागा: ओडिसाच्या परंपरेवर आधारित 'चंद्रभागा' या कन्येची कारुण्यमय आणि कलात्मक कथा यावेळी नृत्यातून सांगण्यात आली.

वसंत आणि फूल: निसर्गाच्या बहराचे वर्णन करणारी ही रचना विशेष लक्षवेधी ठरली.

विशेष सादरीकरण: गुरू शिष्यधर आचार्य यांनी स्वतः रवींद्रनाथ टागोर यांच्या रचनेवर नृत्य सादर करून साहित्याला नृत्याची जोड दिली. तसेच 'कच आणि देवयानी' यांच्या पौराणिक जीवनावर आधारित प्रसंगाने कार्यक्रमाची उंची वाढवली.

या दोन्ही सादरीकरणांमधून भारतीय नृत्यशैलींमधील वैविध्य आणि गुरु-शिष्य परंपरेचे सामर्थ्य पुन्हा एकदा सिद्ध झाले. महोत्सवाच्या या सत्राला कलाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
# आत्ताच एक्सप्रेस
जालना मंगळवार, २० जानेवारी २०२६


# घनसावंगी तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांना २ कोटी ३६ लाखांचा निधी वितरित

**आत्ताच एक्सप्रेस**

**घनसावंगी (प्रतिनिधी)** तालुक्यातील घरकुल योजनेतील रखडलेल्या हप्त्यांमुळे हवालदिल झालेल्या लाभार्थ्यांना अखेर मोठा दिलासा मिळाला आहे. आमदार हिकमतदादा उढाण यांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेमुळे आणि प्रशासनाला दिलेल्या अल्टिमेटममुळे २ कोटी ३६ लाख ८० हजार रुपयांचा निधी लाभार्थ्यांच्या खात्यावर वितरित करण्यात आला आहे. यामुळे अनेक कुटुंबांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण होण्यास मदत होणार आहे.

**आमदार हिकमतदादा उढाण यांच्या आक्रमक पावित्र्याला यश**

घनसावंगी तालुक्यातील घरकुल योजनेचे हप्ते गेल्या अनेक दिवसांपासून रखडले होते, ज्याबाबत लाभार्थ्यांनी आमदार उढाण यांच्याकडे मोठ्या प्रमाणात तक्रारी केल्या होत्या. या प्रश्नाचे गांभीर्य ओळखून आमदार उढाण यांनी १६ जानेवारी २०२६ रोजी शिवसेना जनसंपर्क कार्यालय, घनसावंगी येथे एक विशेष संवाद बैठक आयोजित केली होती.या बैठकीत त्यांनी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी (इऊज) आणि सर्व संबंधित अभियंत्यांची चांगलीच झाडाझडती घेतली.

लाभार्थ्यांना वेळेत हप्ते का मिळत नाहीत? असा सवाल उपस्थित करत, त्यांनी ३१ जानेवारीपर्यंत सर्व प्रलंबित देयके निकाली काढण्याचे कडक आदेश दिले होते.

आमदार उढाण यांनी घेतलेल्या या बैठकीचा सकारात्मक परिणाम अवघ्या काही दिवसांतच दिसून आला. प्रशासनाने युद्धपातळीवर काम करून खालीलप्रमाणे निधी वितरित केला आहे:

प्रधानमंत्री आवास योजना: या योजनेअंतर्गत १९०४ लाभार्थ्यांना एकूण १ कोटी ३९ लाख रुपये वितरित करण्यात आले.राज्य शासन घरकुल योजना: राज्य सरकारच्या विविध घरकुल योजनांमधील ३४६ लाभार्थ्यांना ९७ लाख ८० हजार रुपयांचा लाभ देण्यात आला.हप्ते रखडल्यामुळे



अनेकांची कामे अर्धवट अवस्थेत होती. मात्र, आता थेट खात्यावर रक्कम जमा झाल्यामुळे लाभार्थ्यांनी आमदार हिकमतदादा उढाण यांचे आभार मानले आहेत. जनसामान्यांच्या प्रश्नावर आमदारांनी दाखवलेल्या या आक्रमक तत्परतेची सध्या तालुक्यात चर्चा होत आहे. सर्वसामान्यांचे हक्काचे घर वेळेत पूर्ण होणे गरजेचे आहे.

प्रशासकीय दिरंगाईमुळे गोरगरिबांना त्रास सहन करावा लागू नये, हीच माझी भूमिका होती. आता वितरित झालेल्या निधीमुळे तालुक्यातील घरकुलांची कामे तातडीने पूर्ण होतील. **- आमदार हिकमतदादा उढाण**

## JEE Mainपरीक्षेसाठी परीक्षा केंद्रांच्या २०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/**नॅशनल टेस्टिंग एजन्सीमार्फत (NTA) घेतली जाणारी JEE Main 2026 ही परीक्षा दि. २१ जानेवारी ते २९ जानेवारी २०२६ या कालावधीत पार पडणार आहे. जालना जिल्ह्यातील दोन केंद्रांवर ही परीक्षा होणार असून, या केंद्रांच्या २०० मीटर परिसरात अपर जिल्हादंडाधिकाऱ्यांनी प्रतिबंधात्मक आदेश (कलम १६३) लागू केले आहेत.

महत्त्वाचे तपशील आणि परीक्षा केंद्रे

जालना जिल्ह्यातील खालील दोन केंद्रांवर ही परीक्षा सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.०० या वेळेत घेतली जाईल: १. जेईएस कॉलेज (JES College), जालना. २. इंस्टिट्यूट ऑफ फार्मसी, पाथ्रीकर कॅम्पस, बदनापूर,परीक्षेच्या काळात केंद्राच्या परिसरात शांतता राखण्यासाठी आणि गैरप्रकार रोखण्यासाठी प्रशासनाने खालील सेवा बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

झिरॉक्स आणि फॅक्स सेंटर्स: केंद्राच्या २०० मीटर परिसरातील सर्व झिरॉक्स आणि फॅक्स दुकाने बंद राहतील.दळणवळण साधने: सार्वजनिक टेलिफोन आणि एसटीडी (STD) बुथवर बंदी असेल. ध्वनीक्षेपक: परिसरात ध्वनीक्षेपकांचा (Loudspeakers) वापर करण्यास सक्त मनाई आहे.गर्दीवर नियंत्रण: परीक्षा केंद्राच्या परिसरात अनावश्यक गर्दी करण्यास किंवा शांततेचा भंग करणाऱ्या कृती करण्यास बंदी घालण्यात आली आहे.


हे प्रतिबंधात्मक आदेश दि. २१ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.०० वाजेपासून ते दि. २९ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत अंमलात राहतील.प्रशासनाचा इशारा: या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे अपर जिल्हादंडाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

## संक्षिप्त

### नांदेडमध्ये 'हिंद दी चादर' ऐतिहासिक सोहळा; केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी स्वीकारले निमंत्रण

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली/ प्रतिनिधी/** शिखांचे नववे गुरू, श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त नांदेडमध्ये 'हिंद दी चादर' या भव्य आणि ऐतिहासिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यासाठी केंद्रीय गृह तथा सहकार मंत्री अमित शाह यांना निमंत्रण देण्यात आले असून, त्यांनी २५ जानेवारी रोजी या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे मान्य केले आहे.महाराष्ट्र राज्यस्तरीय समागम समितीच्या पदाधिकाऱ्यांनी नुकतीच नवी दिल्ली येथे अमित शाह यांची सदिच्छा भेट



घेतली. या भेटीदरम्यान समितीने त्यांना कार्यक्रमाची रूपरेषा सांगून अधिकृत निमंत्रण दिले. शाह यांनी हे निमंत्रण स्वीकारले असून ते २५ जानेवारीला दुपारी २ ते ५ या वेळेत नांदेडमधील 'मोदी मैदान' येथे उपस्थित राहतील.

यावेळी शिष्टमंडळात खालील मान्यवरांचा समावेश होता.

महंत बाबुसिंग महाराज (पोहरादेवी, सहअध्यक्ष),रामसिंग महाराज (अध्यक्ष, समन्वय समिती),डॉ. विजय सतबीर सिंग (प्रशासक, गुरुद्वारा नांदेड),रामेश्वर नाईक (समन्वयक) व इतर पदाधिकारी,दिग्गजांची मांदियाळी हा सोहळा २४ आणि २५ जानेवारी २०२६ रोजी रंगणार आहे. या कार्यक्रमासाठी केवळ केंद्रीय गृहमंत्रीच नव्हे, तर इतरही अनेक मोठे व्यक्तिमत्व उपस्थित राहणार आहेत.योगी आदित्यनाथ: उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री २४ जानेवारी रोजी सोहळ्याला उपस्थित राहतील.पं. धीरेंद्र कृष्ण शास्त्री (बागेश्वर धाम): त्यांनीही निमंत्रण स्वीकारले असून ते २४ जानेवारीच्या सत्रात सहभागी होतील.गुरु तेग बहादूर साहिबजी यांनी धर्म आणि मानवतेच्या रक्षणासाठी दिलेले बलिदान अतुलनीय आहे. त्यांना आदराने 'हिंद दी चादर' संबोधले जाते. त्यांच्या ३५० व्या शहिदी दिनानिमित्त आयोजित हा सोहळा नांदेडच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. नांदेड येथील मोदी मैदान येथे या भव्य सोहळ्याची तयारी सध्या वेगाने सुरू आहे.

# चंदनझिरा पोलिसांची धडाकेबाज कारवाई: मंठा येथून चोरीस गेलेली पिकअप अवघ्या काही दिवसांत हस्तगत

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** मंठा पोलीस ठाण्याच्या हद्दीतून चोरीला गेलेल्या पिकअप वाहनाचा छडा लावण्यात चंदनझिरा पोलिसांना मोठे यश आले आहे. पोलिसांनी चोरीचे वाहन जप्त करून मंठा पोलिसांच्या स्वाधीन केले असून, या कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे.

विघोळी (ता. मंठा, जि. जालना) येथील रहिवासी सुरेश विश्वनाथ अवचार यांची पिकअप गाडी (क्रमांक MH-21-AA-8949, किंमत अंदाजे ३ लाख रुपये) दि. १५ जानेवारी २०२६ रोजी अज्ञात चोरट्याने मंठा पोलीस ठाण्याच्या हद्दीतून लंपास केली होती. या प्रकरणी सुरेश अवचार यांनी मंठा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यांच्या तक्रारीवरून गुन्हा रजिस्टर क्र. ००११/२६, कलम ३०३(२) बीएनएस प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा समांतर तपास सुरू असताना, चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांना एका गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, मंठा येथून चोरी झालेली पिकअप गाडी एमआयडीसी परिसरात संशयास्पद स्थितीत उभी आहे. माहिती मिळताच त्यांनी तातडीने शोध पथकाला पाचारण केले.

मिळालेल्या माहितीनुसार चंदनझिरा पोलिसांनी एमआयडीसी भागात शोध मोहीम राबवली. शोध सुरू असताना त्यांना वर्णन केलेली पिकअप गाडी मिळून आली. पोलिसांनी तातडीने वाहन ताब्यात




घेऊन त्याची पडताळणी केली असता, ते मंठा येथून चोरीला गेलेले वाहन असल्याचे निष्पन्न झाले. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर सदर वाहन मंठा पोलीस ठाण्याचे तपास अधिकारी जे. डी. सुक्रे यांच्या ताब्यात देण्यात आले.

ही यशस्वी कारवाई जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, उपविभागीय पोलीस अधिकारी आनंद कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यामध्ये खालील पोलीस अधिकारी व अंमलदारांचा समावेश होता.

बाळासाहेब पवार (पोलीस निरीक्षक, चंदनझिरा),मन्सुब वेताळ (एएसआय),कृष्णा तगे (पोहेकॉ),शरद पवार (पोना),सुधाकर ढाकणे (पोकॉ), पुढील कायदेशीर कारवाई मंठा पोलीस करत आहेत. अवघ्या काही दिवसात चोरी गेलेले वाहन परत मिळाल्याने फिर्यादीने पोलिसांचे आभार मानले आहेत.

# जेईएस महाविद्यालयात 'शाहिरी प्रशिक्षण शिबिरा'चे आयोजन

### नामवंत शाहिरांचे मिळणार मार्गदर्शन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि येथील जेईएस महाविद्यालयाचा लोककला विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने, दिनांक २१ जानेवारी ते ३० जानेवारी २०२६ या कालावधीत 'शाहिरी प्रशिक्षण शिबिरा'चे आयोजन करण्यात आले आहे. लोककलेचा वारसा जपणारा हा उपक्रम महाविद्यालयाच्या लोककला विभागात पार पडणार आहे. या १० दिवशीय प्रशिक्षण शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे, यात महाराष्ट्रातील दिग्गज आणि अनुभवी शाहिरांचे मार्गदर्शन प्रशिक्षणार्थींना मिळणार आहे. यामध्ये शाहीर रत्न डॉ. देवानंद माळी, शाहीर सज्जनसिंग राजपूत, शाहीर सुरेश जाधव, शाहीर आप्पासाहेब उगले, शाहीर शिवाजीराव पाटील, शाहीर संतोष साळुंखे, शाहीर अजिंक्य लिंगायत, शाहीर श्रीकांत शिर्के आणि शाहीर प्रवीण जाधव यांसारख्या मान्यवरांचा समावेश आहे.

**शिबिराची वैशिष्ट्ये:** या शिबिरात सहभागी विद्यार्थ्यांना शाहिरी कलेच्या विविध पैलूंवर सखोल ज्ञान दिले जाईल. यामध्ये प्रामुख्याने खालील गोष्टींचा समावेश असेल. शाहिरी कलेची ऐतिहासिक परंपरा. पोवाडा लेखन व प्रभावी सादरीकरण. शब्दरचना, ताल-लय आणि सुरांचे ज्ञान.आवाज साधना (Voice Culture). प्रभावी व्यासपीठ सादरीकरण (Stage Presence). हे शिबिर लोककलेत आपले भवितव्य घडवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक सुवर्णसंधी आहे.

### प्रवेशासाठी आवाहन

या प्रशिक्षण शिबिरासाठी केवळ २० विद्यार्थ्यांची निवड केली जाणार आहे. त्यामुळे इच्छुक विद्यार्थ्यांनी आपली नावनोंदणी तातडीने करावी, असे आवाहन लोककला विभागातर्फे करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी आणि नोंदणीसाठी प्रा. कल्याण उगले (मो. ९५४५८८८३९७५) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री आणि मराठी विभाग प्रमुख डॉ. यशवंत सोनुने यांनी केले आहे.

# 'हिंद-दी-चादर' कार्यक्रमाची जिल्ह्यात व्यापक जनजागृती करा; अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे यांचे निर्देश

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** श्री गुरू तेग बहादूर जी यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त २४ आणि २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथे 'हिंद-दी-चादर' या भव्य प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या ऐतिहासिक सोहळ्याची माहिती जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचावी आणि भाविकांना यात सहभागी होता यावे, यासाठी प्रशासनाने विविध माध्यमांतून व्यापक जनजागृती करावी, असे निर्देश जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे यांनी दिले आहेत.

जिल्हा परिषदेत आयोजित प्रचार-प्रसिद्धी नियोजन आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, शिक्षणाधिकारी बी. आर. खरात, जिल्हा समाज कल्याण अधिकारी लिंबाजी बारगिरे आणि उपशिक्षणाधिकारी संजय कायंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.



विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन

श्री गुरू तेग बहादूर जी यांच्या महान कार्याचा आणि हौतात्म्याचा इतिहास तरुण पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी शाळा आणि महाविद्यालयांमध्ये विशेष उपक्रम राबविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यामध्ये प्रामुख्याने:प्रभात फेरी: गावागावांतून आणि शहरांतून जनजागृती फेरी काढणे.सांस्कृतिक स्पर्धा: सतिंदर सरताज यांच्या भक्ती गीतांचे गायन, वक्तृत्व आणि निबंध स्पर्धा.कला स्पर्धा: पोस्टर आणि चित्रकला स्पर्धांच्या माध्यमातून गुरुजींचा इतिहास मांडणे. कार्यक्रमाच्या प्रसिद्धीसाठी प्रशासनाकडून सर्वंकष नियोजन करण्यात आले आहे. यात खालील बाबींचा समावेश असेल: १. प्रसारमाध्यमे: प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि सोशल मीडियाचा प्रभावी वापर. २. सार्वजनिक ठिकाणे: बस स्थानक, रेल्वे स्टेशन, मुख्य चौक आणि शासकीय कार्यालयांमध्ये होर्डिंग्ज, फ्लेक्स आणि बॅनर लावणे. ३. चित्ररथ: जिल्ह्याच्या विविध भागात चित्ररथाच्या माध्यमातून माहिती पोहोचवणे. ४. समित्यांचे जाळे: जिल्हा, तालुका आणि ग्रामस्तरीय समित्यांच्या माध्यमातून प्रत्येक घरापर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, मोहयाल, सिंधी, वाल्मिकी, उदासीन आणि वारकरी संप्रदायातील भगत नामदेव समाज अशा विविध समाजांच्या समन्वय समित्यांची मदत घेतली जात आहे.

या सर्व समाजांच्या माध्यमातून गुरुजींचे विचार आणि बलिदानाचा इतिहास घराघरात पोहोचवण्यात येणार आहे.श्री गुरू तेग बहादूर जी यांचे हौतात्म्य आणि त्यांनी दिलेला समतेचा संदेश हा समाजासाठी प्रेरणादायी आहे. नांदेड येथील या भव्य सोहळ्यात जालना जिल्ह्यातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, यासाठी प्रशासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. - शिरीष बनसोडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. जालना

### गुजरातच्या धर्तीवर जालन्यातील प्लास्टिक समस्येवर तोडगा काढा!

# नवनिर्वाचित नगरसेवकांनो, आता तरी जागे व्हा!

### ड. महेश धनावत, कार्याध्यक्ष, नोटरी संघटना यांचे प्रतिपादन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** गुजरात उच्च न्यायालयाने प्लास्टिक कचरा व्यवस्थापनातील हलगर्जीपणाबद्दल जुनागड महानगरपालिकेला आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाने नुकतेच धारेवर धरले. हा निकाल संपूर्ण देशातील स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी एक धोक्याची घंटा आहे. जालन्यातील परिस्थिती यापेक्षा वेगळी नाही. त्यामुळे आता महानगरपालिका निवडणुकीत निवडून येणाऱ्या नवीन नगरसेवकांनी अधिकारांची वाट न पाहता, पहिल्या दिवसापासूनच जालन्याला प्लास्टिकमुक्त करण्यासाठी कंबर कसावी, असे आवाहन नोटरी संघटनेचे कार्याध्यक्ष ड. महेश धनावत यांनी केले आहे.

गुजरातमध्ये एका जनहित याचिकेवर सुनावणी करताना, जुनागड महानगरपालिकेने प्लास्टिक कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी नेमलेल्या संस्थांकडे आवश्यक परवाने नसल्याचे उघड झाले. कचरा वर्गीकरण, संकलन आणि विल्हेवाटीची कोणतीही शास्त्रोक्त पद्धत अवलंबली जात नव्हती. यावरून न्यायालयाने प्रशासनाच्या बेजबाबदारपणा वर तीव्र नाराजी व्यक्त केली. हीच परिस्थिती आज आपल्या जालना शहरातही दिसून येते. शहरात जागोजागी प्लास्टिक कचऱ्याचे ढीग साचले आहेत, गटारे तुंबली आहेत आणि मोकाट जनावरे हाच कचरा खाऊन आजारी पडत आहेत.

या गंभीर समस्येवर बोलताना ड. धनावत म्हणाले की, प्लास्टिक हे एक असे विष आहे जे हळूहळू आपले पर्यावरण, आरोग्य आणि भविष्य पोखरत आहे. प्लास्टिकमुळे जमिनीची सुपीकता नष्ट होत आहे, पाणी प्रदूषित होत आहे आणि अनेक जीवघेण्या आजारांना निमंत्रण मिळत आहे. जुनागडमध्ये जे घडले, ते आपल्या जालन्यात घडू नये यासाठी आतापासूनच ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. केवळ कागदी घोडे नाचवून किंवा तकलादू अहवाल सादर करून ही समस्या सुटणार नाही.

ते पुढे म्हणाले की, जालना शहरातील नागरिक ज्या अपेक्षेने नवीन नगरसेवकांना निवडून देतील, ती अपेक्षा पूर्ण करण्याची जबाबदारी या लोकप्रतिनिधींवर आहे. त्यांनी प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ चा सखोल अभ्यास करावा. या नियमांनुसार प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. ओला व सुका कचरा वर्गीकरणासोबतच प्लास्टिक कचरा वेगळा गोळा करून त्यावर पुनर्प्रक्रिया करण्यासाठी शहरात सक्षम यंत्रणा उभारणे हे नगरसेवकांचे प्रथम कर्तव्य आहे.

ड. धनावत यांनी प्रशासनालाही काही सूचना केल्या. त्यांच्या मते, महानगरपालिकेने केवळ कचरा उचलण्यापुरते मर्यादित न राहता, प्लास्टिक कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या अधिकृत संस्थांची नेमणूक करावी. या संस्थांकडे प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सर्व आवश्यक परवाने आहेत की नाही, याची काटेकोरपणे तपासणी करावी. गुजरातमध्ये ज्याप्रमाणे विनापरवाना संस्था कार्यरत होत्या, तसा प्रकार जालन्यात खपवून घेतला जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

शहरातील गटारे आणि नाल्यांमध्ये अडकलेला प्लास्टिक कचरा पावसाळ्यात मोठ्या समस्येला तोंड फोडतो. यामुळे अनेक भागांत पाणी साचून रोगराई पसरण्याचा धोका निर्माण होतो. यावर नियंत्रण मिळवण्यासाठी प्लास्टिक पिशव्यांच्या वापरावर कठोर निर्बंध आणणे आणि नागरिकांमध्ये व्यापक जनजागृती करणे अत्यंत आवश्यक आहे.

नवीन निवडून येणाऱ्या नगरसेवकांनी केवळ रस्ते आणि दिवे यांसारख्या कामांपुरते मर्यादित न राहता, शहराच्या आरोग्याशी आणि पर्यावरणाशी निगडित असलेल्या या गंभीर प्रश्नाला प्राधान्य द्यावे. गुजरात उच्च न्यायालयाच्या निकालातून धडा घेत, जालन्यातील लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांनी समन्वयाने काम करून शहराला प्लास्टिक कचऱ्याच्या विळख्यातून बाहेर काढावे, हीच शहरवासीयांची अपेक्षा आहे.

### श्री गुरु तेग बहादूर साहिबजी ३५० व्या शहिदी समागम चित्ररथाचे जालन्यात

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/**नांदेड येथे महाराष्ट्र शासनातर्फे २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी आयोजित 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रमाच्या जनजागृतीसाठी विशेष चित्ररथाचे आयोजन करण्यात आले आहे. या चित्ररथाचे उद्घाटन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते मंगळ बाजार येथील गुरुद्वारा परिसरात उत्साहात पार पडले.या उपक्रमाचा



मुख्य उद्देश जिल्ह्यातील शीख, बंजारा, सिंधी, लबाना यांसह नऊ विविध समाजातील भाविकांमध्ये कार्यक्रमाबाबत जागृती करणे हा आहे. हा चित्ररथ जिल्ह्यातील विविध वस्त्या आणि तांड्यांवर जाऊन भाविकांना नांदेड येथील सोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन करेल.उद्घाटन प्रसंगी जगदीश सेवाराम, डॉ. आर.डी. सचदेव, बाबाजी सर्वणसिंग यांच्यासह विविध समाजाचे प्रतिनिधी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या चित्ररथाच्या माध्यमातून जिल्हयातून मोठ्या जनसमुदायाने या ऐतिहासिक सोहळ्याला उपस्थित राहावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813